महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासनाचा (उपक्रम)
CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
Website : www.mahadiscom.in
E-mail : dccell@mahadiscom.in

गोपनीय

शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र. मासं/शिनि/२०१९/ 358

दिनांक : 12 JUL 2019

## परिपत्रक

**विषय:-** प्रलंबित असलेली गौण चुकांतर्गतची प्रकरणे तातडीने १५ दिवसांच्या विशेष मोहिमेअंतर्गत निर्णयांकित करणेबाबत.

---------

१) शिस्तभंग कारवाई प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला असता विविध सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन गौण चुकांतर्गतची प्रकरणे पुढे नमूद कारणांसाठी प्रलंबित राहिलेली दिसून येतात.

अ) कार्यालयास उशीरा येणे, भ्रमणध्वनी बंद ठेवणे, भ्रमणध्वनीस उत्तर न देणे अशा कारणासाठी स्पष्टीकरण विचारले जाते व अधिकारी/कर्मचारी यांचेवर जरब/धाक रहावा म्हणून सदर प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली जातात.

ब) उपविभागीय स्तरावरुन जी गौणचुकांतर्गतची प्रकरणे सुरु करण्यात आली आहेत किंवा जी गौणचुकांची प्रकरणे दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत व कोणत्याही कारणांमुळे सद्यस्थितीत त्या प्रकरणांच्या नस्ती उपलब्ध नाहीत त्यामुळे प्रकरणे निर्णयांकित करण्यास अडचणी येत आहेत.

क) उद्दीष्टपूर्ती न केल्यामुळे मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता यांचे स्तरावरून सर्वच अधीनस्त कर्मचाऱ्यांना गौणचुकांतर्गत स्पष्टीकरण विचारणे /कारणे दाखवा नोटीस बजावणे अशी कारवाई केली जाते परंतु अशी प्रकरणे विहीत मुदतीत निर्णयांकित होत नाहीत.

२) उपरोक्त नमूद कारणांमुळे गौण चुकांतर्गतची प्रकरणे मोठया प्रमाणावर प्रलंबित राहिली असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर प्रकरणांचा परीणाम अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती /उच्चवेतन श्रेणीचा लाभ मिळण्याच्या प्रकरणात जरी होत नसला तरी कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांची अंतिम देयके देताना उपरोक्त प्रकरणांमुळे विलंब होतो तसेच जर एखादया प्रकरणाची नस्ती मिळत नसली तर त्यावेळी प्रकरण निर्णयांकित करताना अडचणी निर्माण होतात. प्रलंबित प्रकरणांमुळे कर्मचाऱ्यांच्या मनोबलावर देखील नकारात्मक परिणाम होत असतो.

३) त्यामुळे शिस्तभंग प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक ठरते आहे. या उपाय योजनांचा पहिला टप्पा म्हणजेच दुरुस्तीचिठ्ठी ४२ दि. ०४/०५/२०१९ अन्वये गंभीर गैरवर्तनाअंतर्गत व गौणचुकांतर्गत कारवाई करण्यास एकच सक्षम अधिकारी विहीत करण्यात आले आहेत. जेणेकरुन शिस्तभंग प्रकरणे अधिक जबाबदारीने हाताळली जातील व त्यांच्या नस्ती बाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे शक्य होईल.

४) तसेच यापूर्वीची दीर्घकाळ प्रलंबित प्रकरणे पुढे नमूद मार्गदर्शक सुचनांनुसार निर्णयांकित करण्यात यावीत असे निर्देशीत करण्यात येत आहेत.

अ) दि. ०१/०१/२०१९ पूर्वी सुरु करण्यात आलेल्या सर्व गौण चुकांची प्रकरणे दि. ३१/०७/२०१९ पूर्वी विशेष मोहिमेअंतर्गत पूर्वीच्याच सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावर निर्णयांकित करावीत.

ब) ज्या प्रकरणांच्या नस्ती उपलब्ध नाहीत, किंवा ज्या प्रकरणांमध्ये मोठया प्रमाणावर कालव्यय झाला आहे व त्यामुळे त्यांचे गांभीर्य नष्ट झाले आहे अशी सर्व प्रकरणे तशा स्वरुपाची कार्यालयीन टिप्पणी सादर करुन दि. ३१/०७/२०१९ पूर्वी निर्णयांकित करावीत.

क) दि. ३१/०७/२०१९ नंतर दि. ०१/०१/२०१९ पूर्वीची सर्व गौण चुकांतर्गतची प्रकरणे रद्दबादल समजण्यात येतील. परंतु जी प्रकरणे सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन विहीत मुदतीत म्हणजे दि. ३१/०७/२०१९ पर्यंत नस्तीबंद होणार नाहीत त्या प्रकरणाबाबत संबंधित सक्षम अधिकारी व मानव संसाधन अधिकारी यांना जबाबदार धरले जाईल.

ड) ज्या प्रकरणात विषयाच्या गांभीर्यामुळे नस्तीबंद करणे उचित होणार नाही असे सक्षम अधिकाऱ्यांचे मत असेल,अशी प्रकरणे विलंबाबाबतच्या कारणमिमांसेसह व सध्याच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह दि. ३१/०७/२०१९ पूर्वी दुरुस्तीचिठ्ठी ४२ दि. ०४/०५/२०१९ अन्वये विहीत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांकडे सेवाविनियम ५ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी सादर करावीत.

इ) तसेच नव्याने सुरु करावयाची सर्व प्रकरणे दुरुस्तीचिठ्ठी ४२ दि. ०४/०५/२०१९ अन्वये विहीत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन सुरु करावीत.

फ) या परीपत्रकाच्या दिनांकानंतर सुरु करण्यात आलेली सर्व गौणचुकांतर्गतची प्रकरणे स्पष्टीकरण पत्र/ कारणे दाखवा नोटीस पत्र इत्यादी संबंधित कर्मचाऱ्याला हस्तातंरीत झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या कालावधीत, निर्णयांकित करणे गरजेचे राहील. अथवा विषयाच्या गांभीर्यानुसार प्रकरण गंभीर गैरवर्तनाअंतर्गत आरोपपत्रामध्ये रुपांतरीत करणे गरजेचे राहील. सदर प्रकरणात कर्मचाऱ्यांकडून विहीत मुदतीत स्पष्टीकरणास कारणे दाखवा नोटीसला उत्तर प्राप्त झाले नसेल तर अशा प्रकरणात एकतर्फी (Ex-Prate) निर्णय होणे आवश्यक राहील.

कोणत्याही परिस्थितीमध्ये गौणचुकांतर्गतचे प्रकरण ३ महिन्यापेक्षा जास्त कालवधीकरीता प्रलंबित राहता कामा नये याची खबरदारी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावर घेण्यात यावी.

५) दुरुस्तीचिठ्ठी ४२ दि. ०४/०५/२०१९ च्या दिनांकापर्यत प्रलंबित असणाऱ्या गंभीर गैरवर्तनाच्या प्रकरणांपैकी जी प्रकरणे अंतीम टप्यात आहेत अशी प्रकरणे दि. ३१/०७/२०१९ पर्यंत पूर्वीच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावर निर्णयांकित करावीत व उर्वरीत प्रकरणे विलंबाच्या कारणमिमांसेसह व सक्षम अधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह दुरुस्तीचिठ्ठी ४२ दि. ०४/०५/२०१९ अन्वये सुधारीत सक्षम अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सेवाविनियम क्र.५ अन्वये सादर करावीत. तसेच नव्याने सुरु होणारी सर्व गंभीर गैरवर्तनाअंतर्गतची प्रकरणे ६ महिन्यापूर्वी निर्णयांकित करणे बंधनकारक राहील.

६) शिस्तभंग प्रकरणात विहीत केलेली कालमर्यादा पाळली न गेल्यास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

(ब्रिगे. पवनकुमार गंजू), (सेवानिवृत्त)
संचालक (मासं)